# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

सर्व नागरिक, हितचिंतक व जाहिरातदार यांना दीपावली निमित्त अभिष्टचिंतन

दिशादर्शक, मार्गदर्शक! दिवा न्यूज परिवार

▶ वर्ष-२ ■ अंक-११ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १७ ऑक्टोबर २०२२ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# समस्यांच्या अंधारातून विकासाचा प्रकाश पाडुया!

## एकजूट होऊया,दिव्याच्या विकासाचा निर्धार करूया!



## सर्व दिवावासीयांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!


9221604204

**-सौ.ज्योती राजकांत पाटील**

महिला मंडळ अध्यक्षा,दिवा भाजपा

# दिवा भाजप,जनतेसोबत!

# कळव्यात रस्ता खचला



**ठाणे:** कळव्याकडून खारेगावकडे जाणारा सह्याद्री सोसायटी समोरील रस्ता बुधवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास खचल्याची बाब समोर आली. खचलेला रस्ता अंदाजे ३÷३ फूट व २.५ फूट खोल असून उर्वरित रस्त्याचा भाग धोकादायक स्थितीमध्ये आल्याने त्या ठिकाणी धोकापट्टी लावून बॅरिकेटिंग करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

कळव्यात रस्ता खचल्याची माहिती मिळताच, घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व ड्रेनेज विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभागाचे कर्मचारी, कळवा पोलीस यांनी धाव घेतली. तातडीने आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी त्या ठिकाणी धोकापट्टी लावून बॅरिकेटिंग केली. यावेळी, कोणतीही जीवितहानी झाली नसून कोणालाही दुखापत झालेली नाही. तर अंदाजे ३÷३ फूट व २.५ फूट खोल इतकी रस्ता खचला असावा असा प्राथमिक अंदाज आपत्ती व्यवस्थापन कक्षाने व्यक्त आहे.

## गुजरात निवडणुक: सुरत जिल्ह्याची जबाबदारी आमदार केळकर यांच्या खांद्यावर

**ठाणे:** पंढरपूर, गोवा आणि कोल्हापूर निवडणुकांची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर भाजप श्रेष्ठींनी गुजरात निवडणुकीत सुरत जिल्ह्याची जबाबदारी ठाणे शहर मतदारसंघाचे आमदार संजय केळकर यांच्याकडे दिली आहे.

डिसेंबरमध्ये गुजरात विधानसभेच्या निवडणुका होत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येथे विशेष लक्ष केंद्रित केले आहे. प्रचार, नियोजन आणि संघटन अशा आघाड्यांवर काम करण्यासाठी महाराष्ट्रातील ज्येष्ठ आमदार आणि लोकप्रतिनिधींनाही जबाबदारी देण्यात आली आहे. ठाणे शहर मतदार संघाचे आमदार संजय केळकर यांना सुरत जिल्ह्यासाठी प्रवासी जिल्हा प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

# नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहचतील अशा दृष्टीने कामे करा

## वैद्यकीय अधिकाऱ्यांना कडक सूचना

**ठाणे :** कळवा येथील ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय तसेच विविध आरोग्य केंद्रात उपचारासाठी येत असलेल्या रुणांना रुग्ण सेवा केंद्र बिंदू ठेवून रुग्णांशी समानुभूतीने संवाद साधा. त्यांचे म्हणणे ऐकून महापालिकेकडे उपलब्ध असलेल्या सर्वोत्तम सेवा दया. याशिवाय महापालिकेतर्फे राबविण्यात येत असलेले राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम हे तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहचतील अशा दृष्टीने कामे करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी यांनी सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारिकांना बुधवारी पार पडलेल्या आढावा बैठकीदरम्यान दिल्या.

ठामपा आयुक्त अभिजित बांगर यांनी दिलेल्या निर्देशानुसार आज अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी महापालिकेतील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात वैद्यकीय अधिकाऱ्यांची आढावा बैठक बोलावली होती. यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. योगेश शर्मा, माता बालसंगोपन अधिकारी डॉ. राणी शिंदे आदी उपस्थित होते.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम हे सर्वच महापालिकांमध्ये राबविले जात आहेत. रुणांच्या आरोग्याशी निगडीत असलेल्या आरोग्य सुविधा या जास्तीत रुग्णांपर्यंत पोहचणे आवश्यक असल्याचे सांगत त्या दृष्टीने कामाचे नियोजन करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. वैद्यकीय अधिकारी यांच्या अधिनस्त काम करणाऱ्या प्रसाविका, आशावर्कर्स यांनी नागरिकांपर्यंत पोहचून राष्ट्रीय आरोग्य उपक्रमांची माहिती त्यांना देणे आवश्यक आहे. तसेच किती गृहभेटी दिल्या त्याचा दैनंदिन तपशील वरिष्ठांना देणे गरजेचे आहे, तसे न झाल्यास संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असा इशाराही माळवी यांनी या बैठकीत दिला.

आरोग्य केंद्रातील सर्व डॉक्टर्स, परिचारिकांनी दैनंदिन बाह्यरुग्ण तपासणी झाल्यानंतर शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची गंभीरतेने दखल घेवून काम करावयाचे आहे. या कार्यक्रमासंदर्भातील दैनंदिन अहवाल वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना देणे बंधनकारक असणार आहे. तसेच कार्यालयाच्या वेळेत उपस्थित राहणे अनिवार्य असून डॉक्टर्स नसल्यामुळे रुग्णांना बराच वेळ थांबून रहावे लागल्यास व तशी तक्रार प्राप्त झाल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी या बैठकीदरम्यान दिल्या.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे, वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# महिला सक्षमीकरणाचे रोपटे वटवृक्षाच्या दिशेने

## ठाण्यात आमदार संजय केळकर यांचा पुढाकार

ठाणे: आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने, 'महिला विकास परिवार'च्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे काम जोमाने होत आहे. पदार्थ विक्रीपासून रिक्षा व्यवसायापर्यंत विविध माध्यमातून निराधार, विधवा आणि गरजू महिलांना रोजगार मिळाल्याने त्यांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होऊ लागले आहे.

'ठाण्यात महिला विकास' च्या माध्यमातून आमदार केळकर यांनी दिवाळीनिमित्त महिला बचत गटांना विविध ठिकाणी दिवाळी फराळ विक्री केंद्र सुरु करून दिले आहेत. हिरानंदानी, नौपाडा, ब्रह्मांड, राबोडी अशा विविध भागात ही केंद्रे सुरू आहेत. पंढरीनाथ पवार आणि स्वाती पवार हे या उपक्रमाची जबाबदारी पार पाडत असतात.

आ. केळकर यांनी त्यांच्या बाजीप्रभू अकादमीमार्फत शेकडो मुली आणि महिलांना स्व रक्षणाचे प्रशिक्षण (कराटे) दिले आहे. शिवाय रिक्षा चालवू शकणाऱ्या महिलांना रिक्षांची व्यवस्था करून दिली आहे. या रिक्षा दिवसभर चालवून संध्याकाळी ठरलेल्या ठिकाणी त्या उभ्या केल्या जातात. या व्यवसायातून मिळणारी कमाई महिलांना कुटुंब चालवण्यास मोठा हातभार लावत आहे. त्यामुळे महिला रिक्षा चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.आ. केळकर यांच्या महिला सक्षमीकरण धोरणामुळे आज अनेक महिला सक्षम झाल्या आहेत. महिला विकास परिवाराच्या माध्यमातून त्या लघुउद्योग, गृहउद्योग, जोडधंदा करत आहेत. यासाठी लागणाऱ्या भांडवलाची व्यवस्था, त्यांच्या अडचणी-




समस्या याबाबत आमदार केळकर हे जागरूकपणे 'महिला विकास परिवार'च्या माध्यमातून महिलांच्या पाठीशी ठाम उभे राहिले आहेत.

महिला सक्षमीकरण करण्याकरिता प्रयत्न झाले पाहिजेत, अशा केवळ गप्पा न मारता प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करण्यास मी प्राधान्य देत आहे. महिला विकास परिवाराच्या माध्यमातून हे कार्य करत असताना मला समाधान मिळत आहे, असे आ. केळकर यांनी बोलताना सांगितले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# सातार्‍यात महिला सुरक्षा पथकाचा पथदर्शी प्रकल्प राज्यात राबवू
## – पालकमंत्री शंभूराज देसाई




**ठाणे :** ठाण्यात शुक्रवारी एका रिक्षा चालकाने तरुणीचा विनयभंग केल्याची दुर्दैवी घटना घडली. अशी घटना घडू नये, महिला, तरुणींना सुरक्षित वाटावे यासाठी कृती आराखडा (अ‍ॅक्शन प्लॅन) तयार करण्याची सूचना पोलिसांना दिले असल्याची माहिती ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी शनिवारी येथे दिली. याचदरम्यान त्यांनी सातार्‍यात महिला सुरक्षा पथकाची पथदर्शी प्रकल्प राबविण्यात आला होता. अशाच प्रकारचा प्रकल्प राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या दोघांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल आणि राज्यात महिला सुरक्षेसाठी ' सातारा पॅटर्न ' राबविण्याची शक्यता यावेळी पालकमंत्र्यांनी व्यक्त केली.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात महिला सुरक्षेसंदर्भात शनिवारी पालकमंत्री देसाई यांनी बैठक घेतली. यानंतर त्यांनी पत्रकार परिषदेस संबोधित केले. यावेळी पोलीस आयुक्त जय जित सिंह, सह आयुक्त दत्तात्रय कराळे, अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) सुरेश जाधव, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री देसाई म्हणाले की, शुक्रवारी घडलेल्या घटनेची माहिती कळाल्यानंतर तातडीने पोलीस आयुक्तांशी बोलून कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. संबंधित तरुणीने तक्रार दाखल केल्यानंतर दोन तीन टीम बनवून आरोपीचा शोध घेतला आणि रात्री त्यास अटक करण्यात आली. असे प्रकार घडू नयेत, यासाठी तातडीने शनिवारी पोलीस दलाबरोबर बैठक घेऊन चर्चा केली. अशा घटना रोखण्यासाठी शाळा, महाविद्यालये व खासगी क्लाससेच्या परिसरात साध्या वेशातील महिलांची नेमणूक करणे तसेच बीट मार्शलच्या गस्तीचे प्रमाण वाढविण्याच्या सूचना यावेळी पोलीसांना देण्यात आल्या आहेत. महाविद्यालयातील युवतींसोबत अशा प्रकारच्या घटना वारंवार करणार्‍यांना प्रतिबंधासाठी विशेष गस्त वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सातार्‍यात महिला सुरक्षा पथकाची पथदर्शी प्रकल्प राबविण्यात आला होता. अशाच प्रकारचा प्रकल्प राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यासाठी मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. पोलीस दलात मनुष्यबळाची कमतरता भासत आहे. त्यासाठी या वर्षी सुमारे पंधरा हजार पोलीस शिपाई भरती करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. पोलीस आयुक्तालयास दुचाकी व चारचाकी वाहने व इतर संसाधनासाठी पोलीस आयुक्तांना प्रस्ताव पाठविण्यास सांगितले आहे. गरज पडल्यास जिल्हा वार्षिक नियोजन निधीतून यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही देसाई यांनी सांगितले.

# आगासन रेल्वे फाटक येथील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी उड्डाणपुल व्हावा यासाठी आपण प्रयत्नशील
## – रमाकांत मढवी

दिवा:-दिव्यातून डोंबिवलीच्या दिशेने जाणाऱ्या दिवा आगासन या मुख्य मार्गावर रेल्वे फाटकामुळे आगासन गाव या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन याठिकाणी उड्डाणपूल बांधण्याचा प्रस्ताव आपण संबंधित विभागांना पाठवला असल्याची माहिती माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांनी दिली.याच बरोबर दातीवली रेल्वे फाटक येथेही उड्डाणपुलासाठी आपण प्रयत्न करत असल्याचे मढवी यांनी सांगितले.

दिव्यातून डोंबिवली शहराच्या दिशेने जाणाऱ्या नागरिकांची संख्या अधिक आहे. शिवाय दातीवली, आगासन, बेतवडे, म्हातार्डी, मानपाडा या भागात रहिवाशी संकुले मोठ्या संख्येने उभी राहत आहेत.दिवा हे रेल्वे स्थानक या भागातील नागरिकांसाठी जवळचे स्थानक असल्याने या भागातून दिवा शहरात रहदारी वाढली आहे. दातीवली व आगासन रेल्वे फाटक येथे रेल्वे क्रॉसिंग मुळे अनेकवेळा सायंकाळी या भागात वाहतूक कोंडी होते.ही समस्या लक्षात घेऊन माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांनी या ठिकाणी उड्डाणपूल होण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.यासाठी संबंधित विभागाकडे मढवी यांनी पाठपुरावा सुरू केला आहे.

# ‘कार्यशैली बदला, शहर स्वच्छ ठेवा, अन्यथा कारवाईला सामोरे जा’

## स्वच्छता निरीक्षकांना अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे यांनी दिला इशारा; भरारी पथके करणार दौरा

**ठाणे : शहरातील स्वच्छतेचा दर्जा वाढविण्यासाठी आपल्या कामाची शैली या क्षणापासून बदलायला पाहिजे. सर्व स्वच्छता कर्मचारी कार्य क्षेत्रात वेळेवर हजर झाले पाहिजेत. स्वच्छतेची कामे झालेली दिसली पाहिजेत. तोंडदेखली, कागदपत्रे नाचवणारी कामे खपवून घेतली जाणार नाहीत, असा कडक इशारा अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे यांनी स्वच्छता निरीक्षकांना दिला.**





ठाणे महानगरपालिकेचे सर्व मुख्य स्वच्छता निरीक्षक, उप स्वच्छता निरीक्षक आणि स्वच्छता निरिक्षकांची बैठक मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झाली. या बैठकीत, अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे यांच्यासह उपायुक्त मनीष जोशी आणि मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी हळदेकर यांनी मार्गदर्शन केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापूर्वीच आपल्याला स्वच्छतेविषयीच्या अपेक्षा सांगितल्या आहेत. एखाद्या वाहून घेतलेल्या अधिकारी- कार्यकर्त्याप्रमाणे कार्यक्षेत्रात उतरून काम करण्याची वेळ आली आहे. हे जमणार नसेल, तर महापालिकेतील त्या स्वच्छता निरीक्षकाला कडक कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी ताकीदही हेरवाडे यांनी दिली.

शहराची ओळख स्वच्छतेतून होते. ठाणे शहर कचरामुक्त करणे व शहराचे सौंदर्य वाढावे व अबाधित ठेवणे हे मुख्यमंत्री शिंदे यांचे स्वप्न आहे. आपल्या घरातील व्यक्ती वापरू शकेल, इतकी सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता हवी. त्यासाठी कार्यक्षेत्रात पूर्णवेळ उभे राहून काम करून घ्या. स्मार्ट वॉचच्या माध्यमातून सर्व कर्मचाऱ्यांच्या कामावरच्या वेळा, जागा हे सगळे कळणार आहे, याची जाणीवही हेरवाडे यांनी करून दिली.

कर्मचाऱ्यांची पूर्णवेळ उपस्थिती दिलेल्या हद्दीप्रमाणे तेथील सर्व स्वच्छता विषयक कामे दररोज दर्जेदार झाली पाहिजेत. त्यावर मुख्य, उप आणि स्वच्छता निरिक्षकांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पर्यवेक्षण करणे. कामात काही त्रुटी असतील तर त्या तत्काळ पूर्ण करून घेणे ही जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, अशी अपेक्षा हेरवाडे यांनी व्यक्त केली.

प्लास्टिक बंदी, घातक कचरा उत्पादन, सांडपाण्यावर शेती करणे, कचरा पेटविणे यावर डोळ्यात तेल घालून कारवाई केली पाहिजे. रात्रीच्या वेळी रस्ते झाडण्याचे काम थांबणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच, वारंवार अनुपस्थित राहणारे, व्यसनी, कामचुकार कर्मचारी यांच्यावर तातडीने कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश हेरवाडे यांनी या बैठकीत दिले.

*दक्षता पथकांची निर्मिती

सकाळी ६ ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते रात्री ११ या काळात दक्षता पथके सर्वत्र फिरणार आहेत. हजेरी पेटीवरील कामगारांची हजेरी, स्वच्छता निरिक्षक यांची उपस्थिती, सफाईच्या कामांचा दर्जा, कचरा संकलन वाहनांच्या फेऱ्या हे सगळे तपासले जाणार असल्याचे उपायुक्त मनीष जोशी यांनी स्पष्ट केले.

# जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे अनेक कठीण प्रसंगावर मात करता आली

## राजेश नार्वेकर यांनी व्यक्त केल्या भावना

ठाणे : ठाणे जिल्ह्यात गेली चार वर्षे काम करताना जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे अनेक कठीण प्रसंगावर मात करता आली, अश्या भावना ठाण्याचे माजी जिल्हाधिकारी व नवी मुंबई महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त राजेश नार्वेकर यांनी बुधवारी व्यक्त केल्या.

नवी मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदी बदली झाल्यानिमित्त जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांचा सन्मान आणि नवनियुक्त जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांचा स्वागत सोहळा आज गडकरी रंगायतन येथे झाला. यावेळी सीमा नार्वेकर, स्मिता शिनगारे, अपर जिल्हाधिकारी मनीषा जायभाये, ठाणे जिल्हा जात पडताळणी समितीच्या अध्यक्ष वैदेही रानडे आदी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांचे वडील अंबादास शिनगारे यांचा नार्वेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महसूल प्रशासनाच्या वतीने नार्वेकर यांचा मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. नवनियुक्त जिल्हाधिकारी शिनगारे व त्यांच्या पत्नी शिनगारे आणि नार्वेकर व त्यांची पत्नी नार्वेकर यांचा जिल्हा प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

नार्वेकर म्हणाले की, जिल्हाधिकारी म्हणून काम करताना अनेक चांगल्या वाईट प्रसंग आले. परंतु जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्या कर्तव्य पारायणता, नि:स्वार्थी भावनेने केलेल्या कामामुळे त्यावर मात करता आली. महालक्ष्मी एक्स्प्रेसवरील आपत्ती, कोविड काळातील प्रसंग किंवा निवडणूक काळात केलेले काम असो या सर्व काळात सहकाऱ्यांनी केलेल्या



कामामुळे जिल्ह्याचे नाव राखले गेले आहे. जिल्हाधिकारी असलो तरी सहकाऱ्यांकडे माणूस म्हणून पाहण्याची भूमिका नेहमी ठेवली आहे. त्यामुळेच प्रशासनाचे भरभरून प्रेम मिळाले.

कोविड काळात ठाणे जिल्हा प्रशासनातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या उत्तम काम व मेहनतीमुळे रेमडेसीविर वाटप किंवा मजुरांना रेल्वेने मूळ गावी पाठविण्यासाठी केलेले नियोजनाचा पॅटर्न देशभर पोचला, असेही नार्वेकर यांनी यावेळी सांगितले.

नवनियुक्त जिल्हाधिकारी शिनगारे म्हणाले की, राजेश नार्वेकर यांच्या सारख्या सक्षम नेतृत्वामुळेच कोविड काळातही ठाणे जिल्ह्याने उत्कृष्ट कार्य करून अग्रभागी राहिला. मुंबई च्या जवळ असलेल्या ठाणे जिल्ह्यात काम करण्याचे मोठे आव्हान नार्वेकर यांनी आपल्या शांत, सुस्वभावी, निग्रही व संयमी स्वभावाने लिलया पेलले आहे. त्यांनी आपल्या कृतीतून आव्हानांना उत्तर दिले. जिल्हाधिकारी पदाचा विश्वासहर्ता वाढविण्याचे काम त्यांनी केले. त्याच्यानंतर जिल्हाधिकारी पदावर काम करण्याचे माझ्या समोर मोठे आव्हान आहे.

राम गणेश गडकरी रंगायतनच्या सभागृहात सुमारे साडेचार चाललेल्या या कार्यक्रमात जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नार्वेकर व शिनगारे यांच्या विषयीच्या आपल्या भावना भरभरून व्यक्त केल्या. नार्वेकर यांच्या सोबत काम करताना आलेले अनुभव, विविध अडचणींवर त्यांनी काढलेले मार्ग याविषयी भावना व्यक्त केल्या. यावेळी श्रीमती रानडे, अपर जिल्हाधिकारी मनीषा जायभाये, अपर जिल्हाधिकारी शिवाजी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, उपजिल्हाधिकारी गोपीनाथ ठोंबरे, उपविभागीय अधिकारी अविनाश शिंदे, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ. मनीष रेंगे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील जाधव, तहसीलदार सर्वश्री जयराज देशमुख, तहसीलदार प्रशांती माने, नायब तहसीलदार दिनेश पैठणकर, अमोल जाधव, गिरीश काळे, सुनील धगळे, गंगाधर आयरे, ऋषिकेश कुलकर्णी यांनी यावेळी नार्वेकर व शिनगारे यांच्या बद्दलच्या भावना व्यक्त केल्या.

तहसीलदार राजेंद्र चव्हाण यांनी मानपत्राचे वाचन केले. जिल्ह्यातील महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा पुरवठा अधिकारी राजू थोटे यांनी आभार मानले तर पंकज चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

# राज्यभरातील पत्रकारांना मिळणार परवडणारी घरे

## ठाणे जिल्हा पत्रकार संघाच्या मागणीनंतर मुख्यमंत्री सकारात्मक

**ठाणे** : राज्यातील विविध महापालिका तसेच स्थानिक स्वराज क्षेत्रातील परवडणारी घरे पत्रकारांना उपलब्ध करून देण्याबाबत सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा. अशी मागणी ठाणे जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एका लेखी निवेदनाद्वारे केली असून मुख्यमंत्री महोदयांनी सदर मागणीबाबत सकारात्मकता दर्शवुन प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, यासंदर्भात लवकरच बैठक बोलावुन निर्णय घेतला जाईल.असेही त्यांनी आश्वासित केले. दरम्यान, हा निर्णय तडीस गेल्यास ग्रामीण भागातील श्रमिक पत्रकारांच्या हक्काच्या घरकुलाचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील शेकडो पत्रकारांच्या हक्काच्या घरांचा प्रश्न धसास लावल्यानंतर आता ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील पत्रकारांच्या घरकुलासाठी पाठपुरावा सुरु आहे. या पार्श्वभुमीवर ठाणे जिल्हा पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाने नुकतीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मंत्रालयात भेट घेतली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार व महाराष्ट्र जनमुद्रा संपादक डॉक्टर दीपक दळवी, पुढारीचे ठाणे ब्यूरो चीफ दिलीप शिंदे,ठाणे वार्ताचे संपादक अमोल सुर्वे, छायाचित्रकार अतुल मळेकर आदी उपस्थित होते.मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष दिलीप सपाटे हेदेखील यावेळी उपस्थित होते. तर ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष राजेश मोरे यांनी पत्रकारांच्या घरा संबंधीच्या या प्रस्तावाला पाठिंबा दर्शविला आहे.

राज्यभरातील पत्रकारांना त्या त्या महापालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत. याबाबतचे निवेदन दिल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी आपण या विषयावर बैठक बोलावुन सविस्तर चर्चा करण्याचे आश्वासित केले.यापूर्वी अंबरनाथचे आमदार डॉक्टर बालाजी कीणीकर यांनीही मुख्यमंत्र्यांना याबाबतचे एक पत्र नगरविकास मंत्री असताना दिले होते.म्हाडाचे तत्कालीन अध्यक्ष आणि विद्यमान मंत्री उदय सामंत हे सुद्धा यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना भेटून याबाबतचा पाठपुरावा करणार आहेत.त्यांच्या काळात ठाण्यातील पत्रकारांच्या घरांचा प्रस्ताव म्हाडाच्या केलेल्या ठरावानंतर प्रलंबित आहे. तरी त्याबाबतही तातडीने निर्णय घेऊन ठाण्यातील पत्रकारांच्या घरांचा प्रश्न मार्गी लावावा. याकडेही मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले.

सदर निवेदनावर सही केल्यानंतर मुख्यमंत्री महोदयांनी, याबाबत आपण लवकरच बैठक घेऊन योग्य तो निर्णय करणार असल्याचे स्पष्ट केले. आमदार प्रताप सरनाईक हे सुद्धा याबाबतच्या निवेदना संदर्भात मुख्यमंत्र्यांनी तातडीने बैठक लावून प्रश्न मार्गी लावावा. अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचे सांगितले. सदरचा धोरणात्मक निर्णय झाल्यास या परवडणाऱ्या घरांच्या योजनेचा लाभ राज्यभरातील ग्रामीण भागातील कमी वेतन आणि मानधनावर काम करणाऱ्या पत्रकारांना होणार आहे.

यावेळी ठाणे शहर व जिल्ह्यातील पत्रकारांना ठाण्याच्या कोलशेत येथे अशर बिल्डर्सने उभारलेल्या इमारतीमध्ये उपलब्ध झालेली परवडणारी घरे देण्याबाबतच्या प्रलंबित असलेल्या प्रस्तावाकडे लक्ष वेधुन पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाने नगरविकास विभाग त्याचबरोबर म्हाडा प्राधिकरणाच्या अखत्यारीतील घरांबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्याची विनंती करण्यात आली.

# अवेळी पडणाऱ्या पावसामुळे ठाणेकरांचे आरोग्य धोक्यात

**ठाणे** : मधेच पावसाची उघडीप तर मधेच मुसळधार पाऊस, यामुळे वातावरणाचा समतोल बिघडला आहे. या बदलत्या वातावरणाचा फटका ठाणेकर नागरिकांना बसू लागला आहे. ६० ते ७० टक्के नागरिक सर्दी खोकल्याने हैराण झाल्याची माहिती समोर आली आहे. याशिवाय, डेंग्यूच्या रुग्ण संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन हा आकडा सप्टेंबर महिन्यात थेट शंभरीच्या उंबरठ्यावर पोहोचल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली. याचदरम्यान जिल्ह्यात डोळ्यांच्या साथीने डोकेवर काढण्यास सुरु केल्याचे दिसत आहे.

जिल्ह्यातील वातावरणाच्या बदलामुळे सगळीकडे सर्दी खोकल्याची मोठ्याप्रमाणात साथ पसरली आहे. विशेष म्हणजे सर्दी खोकल्याचा आजार रुग्णांमध्ये आठवड्यापेक्षाही जास्त दिवस राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. सर्दी खोकल्यामुळे नागरिक प्रचंड हैराण झाले आहेत. जिल्ह्यातील शहरातील लहान क्लिनिकमध्ये दिवसाला उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये ६० ते ७० टक्के रुग्ण असल्याची माहिती समोर आली आहे. या रुग्णांना औषधांसह वाफ घेण्याचे तसेच थंड पेयाचे सेवण करु नये असा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात येत आहे. तर दुसरीकडे जिल्ह्यात डेंग्यूच्या रुग्णातही वाढ झाल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात तब्बल ९९ डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत. जिल्ह्यात सध्या २५ ते ३० टक्के डेंग्यूचा संसर्ग होण्याचे प्रमाण आहे, असे खासगी डॉक्टरांकडून सांगण्यात आले. तीन पेक्षा अधिक दिवस ताप येणे, थंडी तसेच शरिरावर चट्टे उठणे ही लक्षणे डेंग्यूची आहेत. अशी लक्षणे एखाद्या रुग्णास आढळून आल्यास त्याला रक्ताची चाचणी करण्याचा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात येत आहे.

डेंग्यू आणि सर्दी खोकल्याची साथ असताना आता डोळ्यांच्या साथीने डोके वर काढण्यास सुरूवात केली आहे. लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांनाच या साथीची लागण होत आहे. त्यामुळे ज्यांना कोणाला डोळ्यांच्या साथीची लागण झालेली असेल त्यांनी खबरदारी म्हणून स्वत: हुन, स्वत:ला विलगीकरण करुन घ्यावे. तसेच सातत्याने डोळ्यावर थंड पाण्याचा हात फिरवावा, असा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात येत आहे.

## मुख्यमंत्र्यांची ठाणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट

## १८ हजार रुपये सानुग्रह अनुदान केली घोषणा

**ठाणे :** ठाणे महापालिका आणि ठाणे परिवहन उपक्रम यांच्या कर्मचाऱ्यांना सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी दिवाळी सणानिमित्त रुपये १८ हजार इतके सानुग्रह अनुदान देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. गेली दोन वर्षे १५ हजार ५०० रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्यात आले होते. या निर्णयामुळे, ठाणे महापालिकेस सानुग्रह अनुदानापोटी सुमारे १४ कोटी इतका अतिरिक्त भार येणार आहे.

गुरुवारी सायंकाळी झालेल्या तातडीच्या दृक् श्राव्य पद्धतीने झालेल्या बैठकीत सानुग्रह अनुदानाबद्दल चर्चा झाली. मुख्यमंत्री शिंदे यांच्या या बैठकीत, माजी महापौर नरेश म्हस्के, महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे यांनी कर्मचाऱ्यांच्या वतीने मध्यस्थी केली. मागील दोन वर्षे कर्मचाऱ्यांच्या सानुग्रह अनुदानात वाढ केलेली नव्हती. त्या पार्श्वभूमीवर, महापालिकेवर अतिरिक्त भार पडला तरी वाढ करायलाच हवी, असे म्हणत मा. मुख्यमंत्रांनी १८ हजार इतके सानुग्रह अनुदानावर शिक्कामोर्तब केले.

त्याचबरोबर, ऑक्टोबर अखेरीस असलेली दिवाळी लक्षात घेऊन चालू ऑक्टोबर महिन्याचा पगार २० ऑक्टोबरपूर्वी करावा. त्यात विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी सूचना त्यांनी दिली. त्या पद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्याचे ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले. तर, कंत्राटी कामगारांनाही नियमाप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे.

# कोपरीतील 'त्या' दोन शौचालयांच्या कंत्राटदारांवर कारवाईचे आयुक्तांचे पहिल्याच दौऱ्यात आदेश

**ठाणे: चेंदणी कोळीवाड्यातील वस्ती स्वच्छता गृह, तसेच विसर्जन घाट येथील सार्वजनिक शौचालय यांची देखरेख व स्वच्छता करण्यासाठी कोणीही उपस्थित नसणे, नळांना गळती लागून पाणी वाया जाणे, शौचकूपातील अस्वच्छता याबद्दल या दोन्ही शौचालयांच्या कंत्राटदारांवर तत्काळ दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी बुधवारी दिले.**



ठाणे महापालिकेच्या आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर विविध विभागांचा आढावा बांगर यांनी घेतला. त्यानंतर, बुधवारी कोपरी ते आनंदनगर परिसरात प्रथमच त्यांनी दौरा केला. चेंदणी कोळीवाडा, हरियाली तलाव, अष्टविनायक चौक हा भाग त्यांनी पायी फिरून पाहिला. तसेच, कोपरी-मिठबंदर विसर्जन घाट, सॅटीस पुलाचे काम, कचऱ्यातून सापडलेल्या वेगवेगळ्या वस्तूंचे संग्रहालय, कोपरी स्मशानभूमी, राम मराठे उद्यान, सिध्दार्थ नगर परिसर, कपडा मार्केट, ठाणे पूर्व स्टेशन परिसर, आनंदनगर प्रवेशद्वार, सेवा रस्ता, तीन हात नाका ते नितीन कंपनी येथेही आयुक्त अभिजीत बांगर यांनी पाहणी केली. प्रत्येक ठिकाणी तेथील स्थानिक प्रकल्प, स्वच्छता, रस्त्याचा कडेला असलेला कचरा आदींबद्दल त्यांनी नौपाडा परिमंडळाचे उपायुक्त शंकर पाटोळे यांनी सूचना केल्या.

कोळी वाडा वस्ती स्वच्छतागृहातील पाण्याची गळती, शौचकूप आणि व्हरांड्यातील अस्वच्छता, तसेच देखभाल करण्यासाठी कोणीच हजर नसणे, याबद्दल आयुक्त बांगर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. हाच प्रकार, कोपरी-मीठबंदर विसर्जन घाटापाशी असलेल्या स्वच्छतागृहातही होता. या दोन्ही स्वच्छतागृहांच्या कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाईचे आदेश आयुक्तांनी दिले. आपल्या शहरातील सर्व सार्वजनिक शौचालयांची कोणतीही समस्या असेल तर ती प्राधान्याने दूर करावी. नागरिकांची गैरसोय अजिबात खपवून घेतली जाणार नाही, अशी ताकीद आयुक्तांनी दिली.

कोपरी येथील स्मशानभूमीची पाहणी आयुक्तांनी केली. तेथील नागरी सुविधांबद्दल त्यांनी सूचना केल्या. तसेच, या परिसरातील अर्धवट बांधकामेही पाहली.

आनंदनगर जकात नाका ते नितीन कंपनी जंक्शन येथील कामांची पाहणी आयुक्तांनी केली. त्यातील जेथे अजून उद्यानाचे काम झालेले नाही तेथे स्थानिक, आकर्षक झाडे लावण्यात यावीत. त्याची पुर्नरचना केली जावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले.

ठाणे पूर्व येथील सॅटीस पुलाची बांगर यांनी दोन्ही दिशांनी पाहणी केली. कामाची सद्यस्थिती जाणून घेतल्यावर त्यांनी या कामाचे महिनावार नियोजन सादर करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. पुलाशेजारील नाल्यात साठलेला कचरा पाहून त्यांनी असमाधान व्यक्त केले. सॅटीससाठी सिद्धार्थ नगर येथे ठाणे महापालिकेने हटवलेल्या अतिक्रमणाची पाहणी करण्यात आली. तेथेच फुटपाथवर साठवण्यात आलेले कपड्यांचे गठ्ठे तत्काळ उचलण्याचे आदेश अतिक्रमण विभागाला दिले. हरियाली तलावातील पाणी, परिसरातील स्वच्छता याबद्दल आयुक्तांनी समाधान व्यक्त केले. तसेच, तलावाच्या पाण्यावर कचरा राहू नये यासाठी वेळोवेळी स्वच्छता केली जावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. हरियाली तलाव आणि कोपरी विसर्जन घाट येथील निर्माल्य कलशांची दुरावस्था पाहिल्यावर निर्माल्य कलशांतील निर्माल्य उचलले जाण्यासोबतच त्यांची दुरुस्ती करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

आयुक्तांच्या पाहणी दौऱ्यात, कोपरीतील पराग सोसायटी आणि राम मराठे उद्यान येथे असताना एका ज्येष्ठ महिलेने थांबून एक समस्याही कानावर घातली. त्या म्हणाल्या या भागात मोठ्या संख्येने बाईकस्वार अत्यंत वेगात जातात. परिसरातील लहान मुले उद्यानात खेळण्यास येतात. त्यांना इजा होण्याची भीती आहे. त्यामुळे तेवढा गतीरोधक तातडीने द्यावा. आयुक्तांनी या सूचनेची आवश्यकता पडताळून पुढील कारवाई विनाविलंब करण्याचे आदेश दिले.

# सर्वेक्षणात आढळलेल्या १५ कुष्ठरुग्णांच्या उपचारात कोणतीही हयगय नको –आयुक्त अभिजीत बांगर

**ठाणे :** नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्याच्या दृष्टीकोनातून दुर्धर आजारांचे सर्वेक्षण करण्यासाठी सातत्याने महापालिका उपक्रम राबवित असते. याचाच एक भाग म्हणून १३ ते १७ सप्टेंबर आणि २६ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत महापालिका परिक्षेत्रात तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कुष्ठरुग्ण तपासणी विशेष सर्वे क्षण मोहिम राबविण्यात आली . या मोहिमेत एकूण सहा लाख ९८ हजार ७१० नागरिकांची वैद्यकीय तपासणी केली असून यामध्ये १५ रुग्ण आढळून आले. त्या बाधित रुग्णांवर महापालिकेच्यावतीने योग्य औषधोपचार व नियमित तपासणी व मार्गदर्शन करण्याचे काम युध्दपातळीवर राबविण्यात यावे, अशा सूचना आयुक्त अभिजीत बांगर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

महापालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात आलेल्या मोहिमेसाठी ठामपाने एक पुरुष व एक स्त्री अशी एकूण ३३२ पथके कार्यान्वित केली असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिली. या पथकांच्या माध्यमातून सतत १७ दिवस ६२४ सदस्यांनी एकूण १२ हजार ९७३ घरांना भेटी देवून एकूण सहा लाख ९८ हजार ७१० नागरिकांची वैद्यकीय तपासणी केली. प्रत्येक पथकास दैनंदिन २५ घरांना भेटी देण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. या सर्वे क्षणात प्रथमदर्शनी ३ हजार ३८९ संशयित रुग्ण असल्याचे निर्दशनास आले, त्यापैकी ३ हजार ११७ रुग्णांची तपासणी केली असता एकूण १५ जणांना कुष्ठरोगाची लागण झाल्याचे निदान झाले. यामध्ये एकूण पाच रुग्णांना झर्ालिळलरलळश्रश्ररी (कमी प्रमाण) तर उर्वरित दहा रुग्णांना Multibacillary (जास्त प्रमाण) लागण झाल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. योगेश शर्मा यांनी सांगितले.

या सर्वेक्षणामध्ये आढळून आलेल्या एकूण कुष्ठरोग बाधित रुग्णांना आवश्यक ते उपचार तातडीने सुरू करण्याच्या सूचना महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिल्या आहेत. तर उर्वरित नागरिकांची देखील तातडीने तपासणी करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. कमी बाधित रुग्णांना किमान सहा महिने उपचार घेणे गरजेचे आहे. ज्या रुग्णांमध्ये आजाराचे प्रमाण जास्त आहे अशा रुग्णांनी एक वर्षे नियमित उपचार घेणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागानेसंपूर्ण नियोजन करुन आवश्यक औषधोपचार करण्याची करावी तातडीने करावी यामध्ये कोणत्याही प्रकारची हयगय होणार नाही याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी तसेच जे नागरिक बाधित आहेत त्यांनी नि:संकोचपणे उपचार घेवून महापालिकेच्या उपक्रमास सहकार्य करावे, असे देखील आवाहन आयुक्त बांगर यांनी केले आहे. नियमित उपचार घेतल्यास कुष्ठरोगावर निश्चितच आपण मात करु शकतो व याचा प्रसार देखील आपण रोखू शकतो, असेही आयुक्तांनी यावेळी नमूद केले आहे.

## कोपरी आयटीआयच्या नुतनीकरणाचे काम प्रगतीपथावर

## आमदार निरंजन डावखरे यांना राज्य सरकारकडून माहिती

**ठाणे :** कोपरी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (मुलींचे आयटीआय) इमारतीच्या नुतनीकरणाचे काम प्रगतीपथावर असून ते लवकरच पूर्ण होईल, अशी माहिती राज्य सरकारचे रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आम. निरंजन डावखरे यांना पत्राद्वारे कळविली आहे.

मुलींच्या आयटीआय इमारतीची दुरवस्था झाल्याबरोबरच, इमारतीत अनेक गैरसोयी असल्यामुळे गैरसोय होत असल्याकडे आमदार निरंजन डावखरे यांनी विधान परिषदेचे विशेष उल्लेख सुचनेद्वारे लक्ष वेधले होते. तसेच लवकरच नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्याची मागणी केली होती. आयटीआय इमारतीच्या कामासाठी २ कोटी ६२ लाख ८२ हजार रुपये खर्चाला राज्य सरकारने प्रशासकीय मान्यता दिली. तसेच जिल्हा नियोजन समितीनेही निधीसाठी तरतूद केली आहे. त्यानंतर या इमारतीच्या नुतनीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. ते लवकरच पूर्ण होईल, अशी माहिती राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे सिंधुदुर्ग जिल्ह्यात वाकेड ते झाराप १००% काम पूर्ण

गेल्या पाच वर्षापासून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. दरवर्षी काम पूर्ण करण्याची नवीन डेडलाईन देण्यात येते. या मार्गावरील इंदापूर ते झारापदरम्यान ३५५ किमीपैकी २४७ कि.मी.चे काम पूर्णत्वास गेले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात वाकेड ते झारापपर्यंतचे शंभर टक्के काम पूर्ण झाले आहे. तर एकूण महामार्गाचे काम ७३.५४ टक्के पूर्ण झाले आहे. जुलै २०२३ पर्यंत अंतिम मुदत असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग विभागाने मुंबई उच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान दिली.

## भातशेतीचे नुकसान होण्याची शक्यता

गेले काही दिवस परतीच्या पावसाने संगमेश्वर तालुक्यात जोरदार बरसायला सुरवात केली असल्याने हळव्या भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. यावर्षी पाऊस चांगला झाल्याने हळवी शेती वेळीच कापणीला आली आहे. गणपती उत्सव संपल्यावर शेतकरी हळव्या शेतातातील पीक खळ्यात घेण्याच्या तयारीत असतानाच परतीच्या पावसाने धुमाकूळ घालायला सुरुवात केल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे होणारे शेतीचे नुकसान शेतकऱ्याच्या जिव्हारी लागत आहे. मात्र दिवसेदिवस असाच जोरदार पाऊस होत राहिला तर भात, नाचणी या पिकाचे नुकसान होणार आहे.

## रत्नागिरीत राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा

३७ वी किशोर व किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे आयोजन रत्नागिरीतील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर १६ ते १९ ऑक्टोबर दरम्यान करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी राज्यातील ४८ संघ आणि जवळपास ९०० हून अधिक खेळाडू आणि पदाधिकारी रत्नागिरीत दाखल होणार आहेत. या स्पर्धेसाठी रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत, किरण उर्फ भैय्याशेठ सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक पदाधिकारी विशेष मेहनत घेत आहेत. उद्योजक भैय्याशेठ सामंत यांच्या पाठबळामुळे या स्पर्धेचे शिवधनुष्य पेलण्यास पदाधिकारी सज्ज झाले आहेत.

## परतीच्या पावसामुळे भातपिके धोक्यात

संगमेश्वर तालुक्यात शनिवारी दुपारी अचानक ढगांच्या गडगडाटात पावसाने जोरदार बॅटिंग केली. शहरामध्ये तासभरात तुफान पाऊस बरसत असल्याचे पाहायला मिळाले. हा पाऊस सुरुवातीला होणारा आहे की परतीचा अशी आता चर्चा रंगू लागली आहे. मागील दोन चार दिवस सकाळपासून आकाश स्वच्छ असते. दुपार झाल्यानंतर अचानक ढगांच्या गडगडाट पावसाला सुरुवात होते. अशाच पद्धतीचा आज देखील जिल्ह्यात ठिकठिकाणी तासभर बरसलेल्या पावसाने ढगांचा गडगडाटात जोरदार बॅटिंग केली. अचानक आलेल्या पावसामुळे सर्वांची धांदल उडाली होती. या पाऊसांमुळे भातशेतीचे अतोनात नुकसान होण्याच्या चिंता शेतकऱ्यांना लागली आहे. या पडलेल्या पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे अजून पावसाने काळोख केल्याने जोरदार पाऊस होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

जिल्हास्तरावर दर महिन्याला तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात 'जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन साजरा होतो. यावेळी अर्जदार महिला स्मृतः उपस्थित राहून त्यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने निवेदन सादर करतात व त्याअनुषंगाने जिल्हा स्म्रावरील संबंधित अधिकारी यांना महिलांचे वैयक्तिक प्रश्नाबाबत कार्यवाहीबाबत निर्दे श देण्यात येतात.त्याप्रमाणे माहे ऑक्टोबर २०२२ रोजी चा महिला लोकशाही दिन सोमवार १७ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० या वेळेत आयोजित केला आहे.

त्याशिवाय रत्नागिरी जिल्ह्याची भौगोलिक स्थिती लक्षात घेता ज्या महिलांना लोकशाही दिनास प्रत्यक्ष उपस्थित राहता येणार नाही अशा महिलांच्या सोयीच्या दृष्टीने, 'रत्नागिरी जिल्हयातील महिलांना प्रायोगिक तत्वावर फोनव्दारे संपर्क करुन १७ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या महिला लोकशाही दिनात जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांच्या १०७७ या टोलफ्री क्रमांकावर दुपारी १२.००० ते०१.०० या वेळेत त्यांचे निवेदन/ अर्ज नोंदविता येतील असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन समिती रत्नागिरी यांनी कळविले आहे.




# चिपळुण येथील हायटेक एसटी बसस्थानकाची अजुनही प्रतीक्षा

**चिपळूण - गेल्या सहा वर्षापासून चिपळुण येथील हायटेक एसटी बसस्थानकाची प्रतीक्षा अनेकांना लागून राहिली आहे; मात्र अजूनही हे काम रखडले आहे. आता रत्नागिरीतील रखडलेल्या बसस्थानकाचे काम सुरू झाले असताना चिपळूण बसस्थानकाच्या कामाला मुहूर्त कधी मिळणार, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.**

जिल्ह्यातील चिपळूण, रत्नागिरी, लांजा या तिन्ही बसस्थानकांचे काम एकाचवेळी २०१७ मध्ये सुरू केले होते. यामध्ये रत्नागिरी बसस्थानकाचा प्रकल्प सर्वाधिक मोठा आहे. त्यासाठी सुमारे १० कोटीचा खर्च अपेक्षित आहे. त्या पाठोपाठ चिपळूणसाठी ३ कोटी ८० लाख, तर लांजा बसस्थानकासाठी १ कोटी ५० लाखाचा खर्च अपेक्षित आहे. या तिन्ही प्रकल्पांचे काम तितक्याच तत्परतेने हाती घेण्यात आले होते. तत्कालीन पालकमंत्री रवींद्र वायकर यांच्या हस्ते धुमधडाक्यात या प्रकल्पांचा आरंभदेखील झाला होता. जिल्ह्यातील चिपळूण बसस्थानकाच्या कामाचा ठेका स्कायलार्प, रत्नागिरीचा ठेका श्री दत्तप्रसाद कन्स्ट्रक्शन आणि लांजा बसस्थानकाचा ठेका एस. व्ही. एंटरप्राईजेस या कंपन्यांना देण्यात आला.

या कामासाठी श्री दत्तप्रसाद कन्स्ट्रक्शनला ३६ महिन्यांची मुदत तर स्कायलार्प व एस. व्ही. एंटरप्राईजेसला प्रत्येकी २४ महिन्यांची मुदत देण्यात आली होती; मात्र आता हे काम सुरू होऊन ६ वर्षे उलटली तरी प्रकल्पाचा पाया तयार झालेला नाही. काही प्रमाणात झालेल्या कामातील लोखंडदेखील आता गंजून गेले आहे.

गेल्या पाच वर्षात याविषयी अनेकांनी निवेदने व आंदोलने केली पाच वर्षात याविषयी अनेकांनी निवेदने व आंदोलने केली आहेत; परंतु या प्रकल्पांना आजतागायत गती मिळालेली नाही. परिणामी प्रवाशांसह एसटी कर्मचाऱ्यांचेही हाल होत असल्याने येथील ॲड. ओवेस पेचकर यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

# मतदार नोंदणी करण्याचे टीडीएफचे आवाहन

**रत्नागिरी:** कोकण विभागीय शिक्षक मतदारसंघाचे बिगुल वाजले असून, मतदार नोंदणीचा कार्यक्रम सध्या सुरू आहे. कोकण विभागातील टीडीएफच्या सर्व सभासद व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मतदान नोंदणी करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीचे (टीडीएफ) राज्य अध्यक्ष विजय बहाळकर यांनी केले.

पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्य कार्यकारिणी सभेमध्ये ते बोलत होते. दिवाळीनंतर रत्नागिरीत कोकण विभागातील सर्व टीडीएफ पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संयुक्त बैठक लावून निवडणुकीसंदर्भातील दिशा ठरविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या मतदारसंघासाठी समन्वयक म्हणून रत्नागिरी जिल्हा टीडीएफचे अध्यक्ष सागर पाटील यांच्यावर जबाबदारी देण्यात आली. यावेळी नाशिक विभागाचे पदवीधर आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, टीडीएफचे राज्य कार्यवाह हिरालाल पगडाल, राज्य उपाध्यक्ष हनुमंतराव भोसले, रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष सुशांत कविस्कर यासह राज्यभरातून अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नाशिक मतदारसंघातून आमदार डॉ. सुधीर तांबे यांची उमेदवारी टीडीएफ पुरस्कृत करत असल्याचे जाहीर करण्यात आले.कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतून कोकण विभागीय शिक्षक मतदारसंघाची निवडणूक फेब्रुवारी २०२३ मध्ये होणार आहे. या निवडणुकीसाठी सध्या मतदार नोंदणी सुरू आहे. १ नोव्हेंबर २०१६ नंतरच्या सहा वर्षांच्या कालावधीत ज्या शिक्षक, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षकांची किमान तीन वर्षे सेवा झाली आहे,

## किल्ले रत्नदुर्गवर सूचना व मार्गदर्शक फलक नसल्यामुळे पर्यटकांची गैरसोय

**रत्नागिरी-** रत्नागिरी शहराच्या वैभवशाली ऐतिहासिक कारकिर्दीत भर टाकून त्याचे महत्व दाखवणारा रत्नदुर्ग किल्ला पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. याच किल्ल्यावर भगवतीदेवीचे मंदिर आहे, मात्र येथे सूचना व मार्गदर्शक फलक नसल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होते. रत्नदुर्ग किल्ल्याचा दर्शनी भागही दुर्लक्षित आहे याची दखल घेणे गरजेचे आहे, अशी सूचना इतिहास अभ्यासक महेश कदम यांनी प्रशासनाला केली. कदम यांनी विविध ऐतिहासिक किल्ल्यांना भेटी दिल्या आहेत. तेथील ऐतिहासिक संदर्भही शोधून काढले आहेत. रत्नदुर्ग किल्ल्याचा विस्तार सुमारे १२० एकर क्षेत्रफळात असून बालेकिल्ल्यासह तीन किलोमीटर तटबंदी आणि ३५ बुरूज आहेत.

## हल्ला करून मोबाईल चोरणाऱ्या त्रिकुटाला अटक

## ठाणे लोहमार्ग पोलिसांची कामगिरी

**ठाणे:** ऐरोली रेल्वे स्थानकातील तिकीट घरावर उभा असणाऱ्या तक्रारदार तरुणावर चाकूने वार करत त्याचा मोबाईल एका चौकडीने लांबला. हा गुन्हा ठाणे लोहमार्ग पोलिसांनी अवघ्या तासात मोठ्या शिताफीने उघडकीस आणला. तसेच या गुन्ह्यात नवीमुंबईतील राबळे आणि दिवा येथील आकाश प्रभु भावे ऊर्फ आक्या (१८), आशिष रामनयन यादव ऊर्फ पलट्या (१८) आणि तानाजी सागरे ऊर्फ रितीक (१९) या तिघांना जेरबंद करण्यात आले. मात्र त्यांचा फरार साथीदार कृष्णा हा चोरीचा मोबाईल घेऊन पसार झाला आहे. त्याचा शोध सुरू असल्याची माहिती ठाणे लोहमार्ग पोलिसांनी दिली.

ऐरोली रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक १ च्या बाहेरील पश्चिम बाजुकडील तिकीट घरावर बुकींगमध्ये असताना, तीन संशयितांनी तक्रारदार आणि जखमी तरुणाला धक्काबुक्की केली. तसेच त्यांचा मोबाईल फोन जबरीने काढून घेतला. तसेच त्यांच्या डाव्या बरगडीवर चाकूने वार करुन दुखापत करत तो मोबाईल फोन जबरीने चोरी घेऊन पोबारा झाले. हा प्रकार ११ ऑक्टोबर रोजी रात्री ३ ते ३वाजून १० मिनिटांच्या सुमारास घडला होता. याप्रकरणी ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरी कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळावरील सीसीटिव्ही फुटेजच्या आधारे व गुप्त बातमीदारांमार्फत गुन्ह्यातील तिघांना १३ ऑक्टोबर रोजी बेड्या घालण्यात यश आले. तर मोबाईल घेऊन जाणाऱ्या कृष्णा या चोरट्याचा शोध सुरू आहे. तसेच त्या तिघांनी या गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती लोहमार्ग पोलिसांनी दिली. पुढील तपास ठाणे लोहमार्ग पोलीस करत आहेत.

## ठाण्यातील बंद कंपनीत आग

## लाकडी फर्निचरसह कागदपत्रे जळून खाक

**ठाणे:** येथील पोखरण रोड नंबर-०२, येथे मे. एन आर बी बेरिंगस् या बंद कंपनी मधील पहिल्या मजल्यावरील लाकडी फर्निचर व ऑफिस कागदपत्रांना आग लागल्याची घटना मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास समोर आली. सुमारे

पोखरण रोड नंबर-०२, बेथनी हॉस्पिटल जवळील मे. एन आर बी बेरिंगस् या बंद कंपनीत आग लागली. याबाबत माहिती मिळताच, घटनास्थळी वर्तकनगर पोलीस, महावितरण कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली. यावेळी दोन फायर वाहन, एक रेस्क्यू वाहन आणि एक जम्बो वॉटर टँकर पाचारण केले होते. ही आग कंपनीच्या सुमारे ५००० स्केअर फुटच्या पहिल्या मजल्यावरील लाकडी फर्निचर, व ऑफिस कागदपत्रांना लागली. आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाच्या जवानांकडून सुमारे साडेतीन तासाच्या अथक प्रयत्नानंतर त्या आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. या आगीत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# शिवसैनिकांवर होणाऱ्या दडपशाहीला आळा घाला अन्यथा न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागेल

## ठाण्याचे पोलीस आयुक्त जयदीप सिंग यांना निवेदनाद्वारे इशारा



**ठाणे: गेल्या तीन महिन्यापासून पक्षाशी गद्दारी करून झालेल्या सत्ता पलटीमुळे ठाण्यातील राजकीय मंडळी ठाणे जिल्ह्यातील निष्ठावंत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांवर व शिवसैनिकांवर गुन्हे दाखल करून अडकविण्याचे काम सध्या सुरू आहे.**

याबाबत ठाणे जिल्हा शिवसेना शाखेच्या वतीने गुरुवारी ठाण्याचे पोलीस आयुक्त जयजीत सिंग यांची भेट घेऊन दडपशाहीला आळा घाला अन्यथा न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा निवेदनाद्वारे शिवसेनेच्या शिष्टमंडळाने दिला.

याचदरम्यान मासुंदा येथील राजवंत ज्वेलर्स समोर आनंद चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे गेल्या १० वर्षापासून दिवाळी पहाट या कार्यक्रमाचे आयोजन या ठिकाणी करीत असताना यावर्षीही महापालिकेने व अग्निशामक दलाने परवानगीही दिलेली आहे. हे माहीत असून देखील शिंदे गटाकडून केलेल्या अर्जाच्या तारखेच्या मागील तारीख टाकून सत्तेचा दुरुपयोग करून परवानगी घेण्याचे कारस्थान ही मंडळी करीत आहेत. सदर दिवाळी पहाट हा कार्यक्रम आमची परंपरा लक्षात घेता व सदर ठिकाणावर आमचा हक्क लक्षात घेता हा न्याय आम्हाला मिळावा अशी मागणी जिल्हा शिवसेना शाखेच्या वतीने यावेळी पोलीस आयुक्त जयजीत सिंग यांच्याकडे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात १४ ऑगस्ट रोजी मध्यरात्री म्हणजे १५ ऑगस्टच्या प्रारंभी तलावपाळी येथील मध्यवर्ती शाखेमध्ये ध्वजारोहणाचा सोहळा दिवंगत आनंद दिघे यांनी सुरू केलेल्या परंपरेनुसार यावर्षीही असंख्य निष्ठावंत शिवसैनिक मोठ्या संख्येने त्या ठिकाणी पोहोचविले असताना फुटीर गटाकडून चितावणी होत असताना सुद्धा आम्ही संयम दाखवल्यामुळे आणि कायदा सुव्यवस्थेची जाण ठेवून संघर्ष टाळला. त्यानंतर मनोरमा नगर येथे दिघे यांनी सुरू केलेल्या वाचनालयाचे नामफलक काढून शिंदे गटाचा नामफलक लावला जबरदस्तीने वाचनालयाची जागा बळकवण्याचा प्रयत्न केला तेथेही आम्ही संयम सोडला नाही. तसेच ५ ऑक्टोबर शिवाजी पार्क येथील दसरा मेळाव्यास पक्षाचा जय जयकार करत घोषणा देत शिस्तीने ठाणे रेल्वे स्थानकात जात असताना ७७ वर्षाचे निवृत्त शासकीय अधिकारी शंकर गणपत शिंदे त्यांच्यासह १३ ते १४ जणांवर गुन्हा दाखल करून दबाव तंत्राचा वापर केला जात आहे. ज्यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहेत त्यांनाच आज १३ ऑक्टोबर रोजी भल्या सकाळी चाप्टर केस भरल्याच्या नोटीसा देण्यात आल्या.

चेंदणी कोळीवाडा या भागातील गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत असणारी शिवसेनेची शाखा शिंदे गटाकडून दुरुस्ती च्या नावाखाली बळकविण्याचा प्रयत्न करीत असताना सुद्धा अत्यंत संयमाने ही परिस्थिती हाताळून घेतली. तर ९ ऑक्टोंबर रोजी शिवसेना पक्षाच्या वतीने महाप्रबोधन यात्रेची सुरुवात ठाण्यापासून करण्यात आली, त्यावेळी गडकरी रंगायतन येथे आयोजित केलेल्या मेळाव्याला उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे शिवसेने नेते भास्कर जाधव , खासदार विनायक राऊत, शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे, अनिताताई बिर्जे, शिवसेना ठाणे लोकसभा संपर्कप्रमुख मधुकर देशमुख, धर्मराज पक्षाचे व कामगार नेते राजन राजे, सूत्रसंचालक सचिन चव्हाण या ७ जणांवर प्रक्षोभक भाषण दिल्याचा ठपका ठेऊन नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले.

# लफाट चाळीतील ३० सफाई कामगारांचे महापालिकेने केले स्थलांतर

## उर्वरित ६१ कामगारांनाही लवकरात लवकर सदनिका रिक्त करण्याचे आवाहन



**ठाणे:** खारटन रोड येथील महापालिकेच्या जागेत सफाई कामगारांना निवासी जागा उपलब्ध करुन देण्यात आली होती. परंतु मध्यंतरीच्या काळात सदरहू वास्तू धोकादायक झाल्यामुळे या १०० सफाई कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना इतरत्र तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आले होते. आज उर्वरित ३० सफाई कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना खारटन रोडवरील गोठा चाळ स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सहाय्यक आयुक्त सनियंत्रक व समन्वयक महेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली नौपाडा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त अजय एडके यांनी केली.

महापालिकेच्या अत्यावश्यक सेवेतंर्गत येत असलेल्या आरोग्य खात्यातील सफाई कर्मचाऱ्यांना खारटन रोड येथील महापालिकेच्या जागेत जवळजवळ १९१ कर्मचाऱ्यांना सदनिका उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. परंतु सदरहू सदनिका जुन्या झाल्यामुळे सदर भूखंडावर पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी) तत्वावर पुनर्बांधणी करण्यात येणार आहे. यासाठी संपूर्ण भूखंड मोकळा करणे गरजेचे होते. दरम्यानच्या काळात १०० सफाई कर्मचाऱ्यांनी यापूर्वीच जागा रिकामी केली आहे. तर आज उर्वरित ३० कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना गोठा चाळ येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. लफाट चाळीतून स्थलांतरीत करण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना येत्या काळामध्ये सुसज्ज अशी मालकी हक्काची घरे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. सद्यस्थितीत सदर कर्मचाऱ्यांचे महापालिकेने स्थलांतर केले असले तरी त्यांचे मासिक वेतनातील घरभाडे लागू करण्यात येणार आहे. गुरुवारी महापालिकेने कार्यवाही केली असली तरी अजून ६१ कुटुंबिय त्याच ठिकाणी राहत असल्यामुळे विकासकामात अडचणी निर्माण होणार असल्याने या कुटुंबियांने देखील लवकरात लवकर जागा खाली करुन विकासकामाला सहकार्य करावे असेही आवाहन महापालिकेने केले आहे. तसेच सेवानिवृत्त कामगारांची उपदानाची रक्कम त्यांना नियमानुसार देण्यात येणार असल्याची अशी माहिती सहाय्यक आयुक्त सनियंत्रक व समन्वयक महेश आहेर यांनी दिली आहे.


दिवा शहरातील
सर्व नागरिकांना दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
ही दिवाळी सर्वांना आरोग्यदायी,
आनंदाची व सुख समृद्धीची जावो
ही ईश्वर चरणी प्रार्थना!
शुभेच्छुक :
संजय भगत
समाजसेवक, दिवा